# मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकाराने २२ मुलांवर हृदय शस्त्रक्रिया

पुणे : फिनोलेक्स इंडस्ट्रिजचे सीएसआर भागीदार असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनच्या पुढाकाराने ४ महिने ते २० वर्षे या वयोगटांतील एकूण २२ लहान मुलांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात आली. या उपक्रमामध्ये हिलिंग लिटर हार्बर, यू. के. व रुबी हॉल क्लिनिक या दोन संस्थांचा समावेश आहे.

आरोग्याबाबत निर्माण झालेली दरी भरून काढण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचा उगम झाला. दरवर्षी ३ महिन्यांतून एकदा यूकेमधून ६ विशेषतज्ज्ञांचे पथक रुबी हॉलमधील मुलांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यासाठी भेट देतात.

रुबी हॉल क्लिनिक शस्त्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच अशा मुलांची छाननी करण्यासदेखील मदत करतात. जवळपास ५० टक्के शस्त्रक्रिया या २० ते ८० टक्के सवलतींच्या दरात केल्या जातात. हा उपक्रम २०१४ ला सुरु झाल्यापासून सुमारे ६८ मुलांना याचा लाभ घेता आला, असे मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाबिया यांनी सांगितले.